दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १९७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१२ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महाराष्ट्र बंद! | रायगड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## महाविकास आघाडीच्या आवाहनाला पनवेलमधील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्रातील सत्ताधारी महाविकास आघाडीने 'महाराष्ट्र बंद 'ची हाक दिली होती. आज ११ ऑक्टोबर रोजी या घटनेचा निषेध करण्यासाठी राज्यव्यापी बंद पाळण्याचे आवाहन शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या तिन्ही पक्षांनी संयुक्तपणे केले होते. या महाविकास आघाडीच्या महाबंदला पनवेलमधील नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हा बंद यशस्वी केला.



महाविकास आघाडीच्यावतीने आज सोमवारी सकाळी पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे एकत्र येऊन भाजपच्या क्रूर सरकारचा निषेध नोंदविला. यावेळी पनवेल उरण महाविकास आघाडीचे नेते तथा शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, काँग्रेसचे आर.सी.घरत, पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, हेमराज म्हात्रे, निर्मला म्हात्रे, शशिकला सिंग, प्रभाकर कांबळे, राष्ट्रवादीचे आनंद भंडारी, यतीन देशमुख, काँग्रेसचे वैभव पाटील, बबन विश्वकर्मा आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लखीमपूर घटनेचा निषेध करत राज्यात महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र बंदची घोषणा घोषणा देऊन एक प्रकारे भाजप सरकारचा निषेध नोंदविला. भाजपचं सरकार शेतकऱ्यांशी क्रूरपणे वागत आहे. त्यांचे आंदोलन चिरडत आहे. लखीमपूर घटनेतील आरोपींना अटकही करण्यात आली नाही. लखीमपूरची घटना निषेधार्ह असून त्याविरोधात पाळण्यात येत असलेल्या बंदमध्ये शिवसेनेसह राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली. आणि संपूर्ण महाराष्ट्रात भाजपच्या क्रूरतेचा निषेध नोंदविण्यासाठी सदर बंद यशस्वीपणे पार पडला.

उत्तर प्रदेशातील लखीमपूरमध्ये शेतकऱ्यांना चिरडल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने आज पनवेलमध्ये आक्रमक पवित्रा घेतला. लखीमपूर हिंसाचार प्रकरणाचा निषेध म्हणून महाविकास आघाडीकडून आज महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती.

राज्यातील सर्व घटकांनी महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होऊन महाविकास आघाडीकडून करण्यात आवाहनाला सहकार्य केले. आज मेडिकल स्टोअर्स, दूध पुरवठा, रुग्णालये इत्यादी अत्यावश्यक सेवा वगळता इतर बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या. पनवेलमधील पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलोनी, कामोठे, कळंबोली, तळोजा आणि खारघरमध्ये महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी संयुक्तपणे आपली आक्रमकता दाखवून भाजप सरकारचा निषेध नोंदविला.

## उरणला व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवत महाराष्ट्र बंदला दिला प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

उत्तर प्रदेशातील लखीमपूर येथे शेतकऱ्यांच्या विरोधात झालेल्या हिंसाचाराच्या निषेधार्थ, लखीमपूर खेरी येथे आंदोलक शेतकऱ्यांना चिरडण्याच्या घटनेच्या निषेधार्थ उरण महाविकास आघाडीने आज दिनांक ११ ऑक्टोबर रोजी बंद पुकारला होता. त्याला उरणमध्ये उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला होता. या बंद मधून अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या होत्या.

आज सकाळपासून व्यापारी वर्गांनी बंद ठेवून आपला पाठींबा दर्शविला. यावेळी महाविकास आघाडीतर्फे माजी आमदार मनोहरशेठ भोईर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, शेकाप तालुका चिटणीस मेघनाथ तांडेल, सभापती समिधा म्हात्रे, उपसभापती शुंभागीं पाटील, डॉ. मनीष पाटील, विनोद म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, तालुका प्रमुख संतोष ठाकूर, तालुका



अध्यक्ष जे. डी. जोशी, शहर अध्यक्ष किरीट पाटील, गटनेते गणेश शिंदे किरीट पाटील, नरेश घरत, निलेश म्हात्रे, वैशाली पाटील, सीमा घरत, संध्या ठाकूर, रेखा घरत, सुजाता गायकवाड, वंदना पवार, मार्तंड नाखवा, मिलिंद पाडगावकर, विनोंद पाटील, अतुल ठाकूर, गणेश पाटील आदींसह महाविकास आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाविकास आघाडीतर्फे शहरात रॅली काढण्यात आली होती. उरण शिवसेना शहर शाखेजवळ रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केंद्र सरकारचा निषेध केला. उरणमध्ये आजच्या बंदला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

## माणगांवकरांचा महाराष्ट्र बंदला शांततेत प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर**

**उतेखोल / माणगाव** : महाविकास आघाडी सरकारने दिलेल्या बंदच्या साथीला आज माणगांव मध्ये चांगला प्रतिसाद मिळाला.

उत्तरप्रदेश लखीमपूर मध्ये केंद्रीय मंत्र्याच्या पुत्राने केलेला शेतकऱ्यांना चिरडण्याचा क्रुर प्रताप अतिशय निंदनीय असल्याची भावना यावेळी पाहायला मिळाली. सत्तेच्या मस्तीमध्ये शेतकऱ्यांना मारण या निंदनीय घटनेचा माणगांवमध्ये आज निषेध नोंदविण्यात आला. माणगांव मध्ये अत्यावश्यक सेवा वगळता इतर बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या.



करोनामूळे बाजारपेठ चालू बंद होती आणि आता नवरात्रीमूळे मार्केट गजबलेले असायचे अशा वेळी देखील शेतकऱ्यांवरती झालेल्या अत्याचाराचा निषेध म्हणून सुज्ञ माणगांवकरांचा महाराष्ट्र बंदला शांततेत प्रतिसाद पाहायला मिळाला.

यावेळी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते यांनी रस्त्यावर बाजारपेठेत फिरून सर्वांना शांततेत बंद पाळण्याचे आवाहन करत होते.

## भाजप सरकार विरोधातील महायुतीचा बंद पेणमध्ये यशस्वी



**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

उत्तर प्रदेशातील लखीमपुर–खीरी येथील शेतकरी नरसंहाराच्या निषेधार्थ महायुतीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला पेणमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. महाविकास आघाडीच्या आवाहनाला पेण शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी आ–पली दुकाने काही वेळासाठी बंद ठेवून प्रतिसाद दिला. निष्पाप शेतकऱ्यांना आपल्या गाडीखाली चिरडणाऱ्या केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्रा यांचा पुत्र आशिष मिश्रा व दडपशाही करणाऱ्या भाजप सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी पेण शहरातील बाजारपेठसह मुख्य रस्त्यांवरून महायुतीच्या कार्यकर्त्यांनी निषेध मोर्चा काढला. भाजप सरकारच्या दडपशाही धोरणाविरोधात घोषणा देण्यात आल्या. या निषेध मोर्चाचे रूपांतर पेण येथील कोतवाल चौक येथे जाहीर सभेत झाले.

केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा यांना त्वरित गृहराज्यमंत्री पदावरून बरखास्त करावे अशी मागणी काँग्रेसचे शहर अध्यक्ष प्रवीण पाटील यांनी करत पेण मधील व्यापाऱ्यांनी स्वतःहून दुकाने बंद करत दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांचे आभार मानले.

त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांना देखील व्यापाऱ्यांना त्रास देऊ नका, ते कायम आपल्या सोबत आहेत असे सांगून सर्वपक्षीय नेते– कार्यकर्ते यांनी महाराष्ट्र बंद यशस्वी केल्याचे जाहीर केले.

## उरणला व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवत महाराष्ट्र बंदला दिला प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । धाटाव**

उत्तर प्रदेश राज्यातील लखीमपूर खिरी येथील शेतकऱ्यांवर गाड्या घालून बळीराजाला चिरडणाऱ्या केंद्र सरकारचा राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस व इतर घटक पक्षांनतर्फे जाहीर निषेध करीत आहोत असे मत राज्य मंत्री तथा रायगडच्या पालक मंत्री आदिती ताई तटकरे यांनी आंबेवाडी नाका येथील महाराष्ट्र बंद च्या मोर्चाच्या वेळी आपले मत व्यक्त केले.

खिरी येथील शेतकऱ्यांच्या अंगावर गाड्या घालुन क्रूर कर्माच्या वाईट भाव–नेने केलेल्या हत्तेच्या कटाचा आम्ही केंद्र सरकारचा जाहीर निषेध करीत असुन यापुढे आम्ही बळीराजावर करण्यात येणाऱ्या कोणत्याही अन्याय खपवून घेणार नाही.आम्ही नेहमीच शेतकऱ्यांचा पाठीशी उभे राहू असे मत रायगडच्या पालकमंत्री आदितीताई तटकरे यांनी व्यक्त केले.

यावेळी रोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याच्या महिला अध्यक्ष प्रितम पाटील, रोहा पंचायत समिती सदस्य सिद्धी रजिवले, आंबेवाडी जि.प.गट अध्यक्ष सुप्रिया जाधव, आंबेवाडी जि.प.गट अध्यक्ष नरेंद्र जाधव, खांब पं. स. गण अध्यक्ष समीक्षा घावटे, खांब पं. स. गण अध्यक्ष मनोज शिर्के, आंबेवाडी पं.स. गण अध्यक्ष विजय कामथेकर, खांब पं. स. गण अध्यक्ष शीतल बांगल, आंबेवाडी सरपंच सुरेश महाबळे, उपसरपंच श्रीकांत चव्हाण, गोवे ग्रामपंचायत सरपंच महेंद्र पोटफोडे, उपसरपंच नितीन जाधव, युवा कार्यकर्ते राकेश शिंदे, संजय मांडळुस्कर, नरेंद्र पवार, संदीप जाधव, कुमार लोखंडे, तसेच खांब कोलाड विभागातील सर्व सरपंच उपसरपंच व सदस्य, असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



## पोलादपूर शहरात महाराष्ट्र बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महत्वाचे शहर असलेल्या पोलादपूरमध्ये लखीमपूर खेरी येथील केंद्रीय मंत्रीपुत्राकडून झालेल्या शेतकरी हत्येच्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर आज महाआघाडी सरकारमधील घटक पक्षाच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी कडकडीत बंद पाळून निषेध केला. तालुक्यातील व्यापारी व व्यावसायिकांनीही या बंदला उत्स्फूर्तपणे सहकार्य केल्याने कोठेही वादविवादाच्या घटना दिसून आल्या नाहीत.

महाराष्ट्र बंद संदर्भात पोलादपूर तालुक्यात सोशलमिडीयावर उलटसुलट चर्चा घडून येत असताना प्रत्यक्षात सकाळपासून कोणीही दुकाने उघडली नसल्याने आपोआपच कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना कोणतेही काम राहिले नाही. केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांना पदावरून तातडीने हटविण्यासाठी आणि त्यांचा म ुलगा आशिष मिश्रा यास तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी महाआघाडी सरकारने महाराष्ट्र बंदचे आवाहन केल्यानुसार शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सोशल मिडीयावरून हे आवाहन पोलादपूरकरांना केले. यामुळे सकाळी कोणीही दुकाने उघडण्याची तसेच व्यापार व्यवसाय सुरू करण्याची तसदी घेतली नाही. पोलादपूर शहरातील गाडीतळ, महामार्ग, महाबळेश्वर मार्ग, जुना महाबळेश्वर मार्गावरील बाजारपेठ तसेच बँक ऑफ इंडियापासून गांधी चौकापर्यंतची बाजारपेठ पूर्णत: बंद ठेवण्यात आली. पोलादपूर एस.टी. बसस्थानकामध्ये बसची प्रतिक्षा करणारे प्रवासी अनेक तास स्थानकामध्ये रखडले. पोलादपूर तालुक्यातील लोहारमाळ, चांभारगणी, कापडे बुद्रुक, पळचिल, साखर तसेच पितळवाडी येथील दुकानेदेखील बंद ठेवण्यात आल्याने कडकडीत बंद यशस्वी झाला.



# कंगाल 'महाराजा' स्वगृही

जेआरडी टाटा या द्रष्ट्या आणि देशभक्त उद्योगपतींनी स्थापन केलेली विमान कंपनी जवळपास नऊ दशकांचा प्रवास करून पुन्हा टाटा उद्योगसमूहाकडे आली आहे. 'एअर इंडिया'चा हा प्रवास म्हणजे समाजवादाच्या भोंगळ कल्पना, प्रशासनातील ढिलाई, मंत्र्यांपासून खालपर्यंत बोकाळलेला भ्रष्टाचार, पाण्यात जाणाऱ्या जनतेच्या पैशाबद्दलची बेफिकिरी आणि प्रतिष्ठेच्या बाष्कळ कल्पना या साऱ्यांचे विदारक दर्शन आहे. टाटांनी पुन्हा एअर इंडिया घेणे, याला एक भावनिक कोन आहे. १९३२ मध्ये जेआरडींनी स्थापलेल्या टाटा एअरलाइन्सची १९४९ मध्ये एअर इंडिया झाली. जेआरडी टाटा ते रतन टाटा हा एअर इंडियाचा प्रवास काव्यगत न्याय देणारा वाटला, तरी राष्ट्रीयीकरणानंतर आणि विशेषकरून १९७८ नंतर एअर इंडिया गाळात जायला सुरूवात झाली. एअर इंडियात पैसा टाकणे म्हणजे तळात भगदाड असणाऱ्या रांजणात मोहरांचा वर्षाव करणे आहे, हे पहिल्यांदा गंभीरपणे अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना ओळखले. तेव्हाच एअर इंडिया विकण्याचा पहिला प्रयत्न झाला. नंतर दुसरा झाला आणि शेवटी हा तिसरा यशस्वी झाला. नेहरू सरकारने विमान कंपनी किंवा हॉटेले यांच्यात जनतेचा पैसा गुंतवू नये, असे काही शहाणे खासदार १९५२ पासून सांगत होते. तरी नेहरूंनी निदान जेआरडींना एअर इंडियात प्रमुख म्हणून ठेवले. तो काळ कंपनीच्या भरभराटीचा होता. १९७८ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी जेआरडींना अपमानास्पद निरोप देऊन एअर इंडियाच्या कबरीची पहिली कुदळ मारली. पुढे सर्व सरकारे, मंत्री, नोकरशहा, दलाल आणि कामगार नेते यांनी एअर इंडियाचे केवळ लचके तोडले. अशा गलितगात्र, कर्जबाजारी, बेशिस्त आणि आमूलाग्र भ्रष्ट कंपनीला नवसंजीवनी देण्याचे आव्हान टाटांसमोर आहे. ते पेलणे सोपे नाही आणि एका रात्रीत हा चमत्कार होणारही नाही. टाटांनी एअर इंडियासाठी १८ हजार कोटी मोजले. (टाटांकडून ती घेताना नेहरू सरकारने दोन कोटी ८० लाखांची भरपाई दिली होती.) शिवाय, १५ हजार कोटींचे कर्ज डोक्यावर आहे. विमानांचा ताफा जुना होतो आहे. दरम्यानच्या काळात टाटांनी 'विस्तार' ही हवाई कंपनी सुरू केली आहे. एअर एशिया इंडियातले भांडवल ८६ टक्क्यांपर्यंत नेले. सिंगापूर एअरलाइन्सशी करार केला. याशिवाय, एअर इंडिया एक्सप्रेस ही एअर इंडियाची शेजारी देशांमध्ये व देशांतर्गत सेवा देणारी वेगळी शाखा आहे. या साऱ्यांचा मेळ घालून एक बलाढ्य कंपनी उभारणे आणि ती ग्राहकाभिमुख बनवणे, हे मोठेच आव्हान आहे. या तीन कंपन्यांमध्ये समान कार्यसंस्कृती व चपळाई आणणे, हे काम टाटा समूहाला तातडीने करावे लागेल. एअर इंडियाच्या प्रवासात दोन मोठ्या चुका झाल्या. एकीकडे, उदारीकरणानंतर खासगी कंपन्यांसाठी आकाश मोकळे होत असताना एअर इंडियाचे पंख दुमडण्यात आले आणि २००६ मध्ये 'इंडियन एअरलाइन्स'चे ओझे 'महाराजा'च्या गळ्यांत बांधण्यात आले. या साऱ्याचा परिणाम नव्या एअर इंडियाला भोगावा लागेल. एअर इंडियाचे माजी कार्यकारी संचालक जितेंद्र भार्गव यांनी गुलामनबी आझाद किंवा प्रफुल पटेल या मंत्र्यांची नावे घेऊन सरकारी कारभारातील त्रुटी आणि भ्रष्टाचारावर बोट ठेवले होते. आपल्याला हवी असणारी माणसे नेमली गेली नाहीत तर सारी भरती प्रक्रिया रद्द करणे, तोट्याचे मार्ग एअर इंडियाला आणि फायद्याचे खासगी कंपन्यांना, संशयास्पद विमानखरेदी असे अनेक प्रकार झाले. हा सारा इतिहास लक्षात ठेवून टाटा समूहाला नवी एअर इंडिया घडवायची आहे. गेल्या तीस वर्षांमध्ये विमान प्रवासात क्रांती झाली आहे. सिंधुदुर्गमधील चिपी विमानतळाचे उद्घाटन करताना केंद्रीय विमान वाहतूकमंत्री ज्योतिरादित्य शिंदे मोदींचा हवाला देऊन 'हवाई चप्पल में हवाई यात्रा' असे म्हणाले, ते खरेच आहे. मात्र, कमी दरात स्पर्धात्मक सेवा देताना विमान कंपन्यांच्या नाकी नऊ येत आहेत. जगभर नजर टाकली तर बलाढ्य विमान कंपन्यांना गाशा गुंडाळावा लागला. गेल्या तीन वर्षांत जगात दीडशे विमान कंपन्यांचे दिवाळे निघाले. करोनाने हे संकट अधिकच तीव्र केले. अनेक देशांमध्ये खासगी कंपन्यांना शेवटी तिथल्या सरकारांनी आर्थिक आधार दिला. या पार्श्वभूमीवर एअर इंडियासमोरील आव्हान किती मोठे आहे, याची कल्पना यावी. सुदैवाने, सध्या करोना काहीसा माघारतो आहे आणि अर्थव्यवस्थेला गती मिळते आहे. अशावेळी, सात दशकांनी स्वगृही परतलेल्या एअर इंडियाच्या कंगाल आणि खंक 'महाराजा'ला पुन्हा किनखापी, भरजरी पोषाख चढविण्यात टाटा समूहाला यश यायला हवे. बेछूट, भ्रष्ट सरकारीकरण आणि निव्वळ नफेखोर खासगीकरण यांच्या मधून जबाबदार उद्योजकतेचा मार्ग जातो. त्या मार्गावरून एअर इंडियाने आता नवी भरारी घ्यावी!

# नकोबां हा कोरोना, जाम कटाला आलायं त्याचा! आदिवासी महिलांची व्यथा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

नवरात्रौत्सव सुरु झाला कि गरबा खेळण्याची नऊ दिवस मजा असते. लहानथोर मुल, मुली, महिला, पुरुष अगदी बेधुंद होऊन विशिष्ठ संगिताच्या ठेक्यावर गोलचक्राकार फेर धरत नृत्य करतात. सगळीकडे नवरात्र मंडळांचे मंडप आकर्षक रोषणाई आणि डिजेवर संगिताची लयलुट असते. विविध स्पर्धांनी नऊ दिवस सरुन दसरा केंव्हा येतो हे कळत देखिल नाही. परंतु गेले दोन अडीच वर्षापासुन कोरोना संकटाने या सर्व सणवारांची मजा संपवली, सर्वांचा हिरमोड झाला. अशाही परिस्थितीत आपल्या पोटा पाण्याचे दुःख विसरुन कोरोनाचा नाश होऊ देत! आता हा कोरोना मरु देत! नकोबां हा कोरोनां, जाम कटाला



आलायं त्याचा!.अशा प्रकारच्या भावना व्यक्त करुन गरबानृत्य करीत तालुक्यातील आदिवासी महिला नवरात्रौत्सवाचा आनंद घेताना दिसत आहेत.

नुकतेच ज्ञानमंदिर व देवालये उघडली व सर्वांना आनंद झाला होता, यंदातरी नवरात्री उत्सव आनंदात सुरु होईल! परंतु अस काही झालच नाही. अजुनही संकट कायम आहे. वरुन आसमानी व तिसऱ्या लाटेची भिती आहेच. यासर्व विपरित परिस्थितीचा काहीक्षण का होईना विसर पडावा! या पार्श्वभुमीवर नटुन थटुन रंगबिरंगी साड्या नेसुन समुहाने बाहेर पडलेल्या माणगांव तालुक्यातील होडगांवच्या आदिवासी महिलांचे हे वैशिष्ठ्यपूर्ण गरबानृत्य आणि त्यांनी रचलेली परंपरागत गाणी कदाचीत आपल्याला समजणार नाहीत परंतु ज्या पध्दतीत खास लाकडी टिपऱ्या वाजवत गोल चक्राकार फिरत एकाचवेळी सूर-तालात गाण गात फेर धरुन दारोदार आनंदाने नृत्य करताना दिसून येत आहेत.

# राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची केंद्र सरकार विरोधात घोषणाबाजी : नागोठण्यात बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । वाकण**

उत्तर प्रदेश लखीमपुर खेरी येथे गाड्या अंगावर घालून बळीराजाला चिरडणाऱ्या केंद्र सरकारचा जाहिर निषेध करण्यासाठी महाविकास आघाडी सरकारतर्फे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खा. शरदचंद्र पवार, शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्र बंदची हाक दिली असतानाच रायगड जिल्ह्याचे खासदार सुनीलजी तटकरे यांच्या आशिर्वादाने तसेच रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. आदितीताई तटकरे, आमदार अनिकेतभाई तटकरे व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुरेशभाऊ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे शहर आणि विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने केंद्र सरकारचा सोमवार दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जाहिर निषेध करण्यात आला. यावेळी नागोठण्यातील सर्व व्यापारींनी नागोठणे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी अत्यावश्यक सेवेतील दुकाने सुरु ठेवण्यात आली होती.

निषेध असो निषेध असो केंद्र सरकारचा निषेध असो, नही चलेगी नही चलेगी दादागिरी नही चलेगी, शेतकऱ्यांना चिरडणाऱ्या केंद्र सरकारचा निषेध असो अशा विविध घोषणा देत छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून निघालेली राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची रॅली बाजारपेठ, खुमाचा नाका मार्गे नागोठणे पोलीस ठाण्यापर्यंत आल्यानंतर रॅलीची सांगता झाली. या रॅलीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाई टके, विलास चौलकर, कृष्णा धामणे, वसंतराव महाजन, सुधाकर जवके, राष्ट्रवादीचे विभागीय अध्यक्ष संतोषभाई कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, शहर सचिव रोहिदास हातनोलकर, ग्रामपंचायत सदस्य अखलाक पानसरे, विनय गोळे, सचिन



कळसकर, युवक शहर अध्यक्ष कुणाल तेरडे, पप्पूशेठ अधिकारी, अलिमभाई मांडलेकर, निवास पवार, प्रकाश मोरे, दिनेश घाग, ॲड. श्रीकांत रावकर, सिद्धार्थ काळे, अमित जांबेकर, नितीन पत्की, बिपीन सोष्टे, शहर उपाध्यक्ष झिशान सय्यद, मनोज ताडकर, शाम पाटील, निलेश म्हात्रे आदींनी सहभाग घेतला होता.

# माजी विद्यार्थ्यांनी वि.ह.परांजपे विद्या मंदिरास केलेली मदत प्रेरणादायी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

२२ जुलै ला महाड मध्ये महापुरात शाळेच खूप नुकसान झाले होते. हे पाहण्यासाठी सन १९७९ च्या दहावीच्या बॅच मधिल माजी विद्यार्थी संदेश कुलकर्णी यांनी शाळेला भेट दिली असता त्याना शाळेतील प्रयोगशाळेची दुरावस्था पाहवली नाही. ही गोष्ट त्यानी आपल्या १९७९ च्या बॅचमेट सोबत व्हाटस्प गृपवर शेअर केली. क्षणाचाही विलंब न लावता नोकरी, व्यवसाया निमीत्त दूरवर गावात, शहरात, परदेशात वास्तव्यास असलेल्या दहावीतील या माजी विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने एक भरीव मदत निधी गोळा केला व शाळेला आवश्यक साहित्य सुपूर्द केले आहे. माजी विद्यार्थ्यांनी वि. ह. परांजपे विद्या मंदिरास कठीण प्रसंगी केलेली ही मदत प्रेरणा दायी असल्याचे शाळेचे म्हणने आहे.

स्नेहमेळाव्यातुन सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणणारे सुनिल कुडाळकर, डॉ. सुबोध मेहता यांनी शाळेला काहीतरी मदत करावी अशी संकल्पना याआधीच व्यक्त केली होती. दरम्यानचे काळात या बॅचचे माजी विद्यार्थी संदेश कुलकर्णी, रविंद्र कुवेसकर, नफीस शहापूरी, दिनेश शिवदे, श्रिकांत ओक, मंगेश जोशी, प्रदीप शेट, विजय जाधव यांनी प्रातिनिधीक स्वरुपात महाडच्या आपल्या विनायक हरी परांजपे विद्यामंदिरास भेट देऊन शाळेच्या मुख्याध्यापिका व शिक्षकवृंदा सोबत चर्चा केली होती. महापूरात शाळेचे झालेले नुकसान संदर्भात संपूर्ण माहिती त्यांनी दिल्यानुसार प्रयोगशाळेतील नुकसान झालेले साहित्य तसेच शाळेला आवश्यक लॅपटॉप देखिल देण्याचे त्यांनी ठरविले. ही मदत बॅच मधिल माजी विद्यार्थी ज्यांना दूर्दैवाने या कोव्हिड कालावधित आम्ही गमावले पैकी एक महाड मधिल नामांकित वकील कै. प्रशांत साबळे व कै. अजित गांधी यांचे स्मरणार्थ गुरुवार दि. ७ ऑक्टोबर रोजी घटस्थापनेच्या दिवशी माजी विद्यार्थी श्रीकांत ओक, विजय जाधव, दिनेश शिवदे, प्रदीप शेट, प्रदीप चव्हाण विवेक जोशी यांनी प्रत्यक्ष शाळेत जाऊन भेट दिली आहे. यावेळी शाळा समितीचे चेअरमन दिलीप पार्टे, मुख्याध्यापिका साधना गांधी तसेच शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी शाळेच्या वतिने १९७९ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

अनेक वर्षांनी शाळेचे प्रांगणात प्रवेश करताच या माजी विद्यार्थ्यांना खुप आनंद झाला. आपल्या तत्कालिन बालपणीच्या आठवणीत जो तो हरवला. शाळेतील आपले गुरुजन, शाळेचा रंगमंच, ड्रॉईंग हॉल कलाशिक्षक चांदे सरांची आठवण सांगताना मंगेश जोशीने अगदी रंग, ब्रश, पॅलेटसह सांगितली. शाळेतील मल्लखांब आणि उतेकर मास्तरांची चापट सावंत सर, गोरे सर, नागनुर सर, चक्रदेव सर, जोगळेकर मॅडम, जोशी मॅडम आणि आपल्या सर्वांच्या अनेक आठवणी व्यक्त करीत शाळेच्या प्रांगणात फिरताना आजही त्या सर्व शालेय वास्तु या माजी विद्यार्थ्यांना खुणावत होत्या. जिओग्राफी हॉल, प्रयोगशाळा तसेच दूरदर्शन संच ठेवलेला तो वर्ग आणि त्या वेळची दूरदर्शनची ती टँ नॅ नॅ ढँण..ही धून आजही ते बालपण आपल्यात कुठेतरी लपले आहे, ते जागृत करत होती. शाळेच्या गुणवंत विद्यार्थीच्या यादीत आमच्या १९७९ बॅच मधिल सध्याचे नामांकित डॉक्टर सुबोध शरद मेहता याचे नाव व त्याने मिळविलेले गुण पाहुन सर्वांना आनंद झाला, या बॅच मधिल माजी विद्यार्थी डॉ. समिर सावदेकर नागपूर, डॉ. अजय जोगळेकर व डॉ. विवेक मेहता महाड तसेच काही वकिल, प्राध्यापक, इंजिनियर, उद्योजक म्हणुन नावलौकीकास पात्र झाले आहेत. आपण सर्व कर्तव्य भावनेतून शाळेचे काही देणे लागतो या उद्देशाने ही मदत केल्याचे एक वेगळे समाधान या निमित्ताने मिळाले असल्याची भावना वयाच्या साठी कडे झुकलेल्या या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

# बालकामगार नियुक्त केल्याने गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील श्री जी स्विटस अंड स्नॅकस येथे बालकामगार नियुक्त केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळंबोली रोडपाली सेक्टर २० येथील श्री जी स्वीट्स अंड स्नेक्स येथे बाल कामगार काम करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी या ठिकाणी काम करणाऱ्या दोन बालकामगारांना ताब्यात घेतले. स्वीट चालक मालक यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# तळा तालुक्यातील ज्ञान दिप माध्यमिक हायस्कूल बोरघर हवेलीच्या चेअरमनपदी दिपक रसाळ

**दै.रायगड नगरी । तळा**

जनजागृती शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे ज्ञानदिप माध्यमिक हायस्कूल बोरघर हवेलीच्या शे का प.चे चेअरमनपदी दिपक रसाळ तर उप चेअरमनपदी शेतकरी कामगार पक्षांचे जेष्ठ नेते कानुशेठ विचारे याची बिन विरोध निवड झाली.

नविन कमिटीचा कार्यकाळ तीन वर्षाचा २०२१ ते २०२४ असून संस्था अध्यक्ष मनोहर करणसरचिटणीस मनोहर काप सहसचिव नाना साहेब दळवी खजिनदार पांडुरंग माळी, अनंत माळी सदस्य यशवंत मोंडे, नरेंद्र घाडगे, लक्ष्मण खांडेकर, कृष्णा जाधव, विलास कदम परशुराम वरंडे सदस्य अशी कमिटी झाली असून तळा तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा दिल्या या सर्व नवनिर्वाचित कमिटीचे सत्कार तळा तालूका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने करण्यात आला. त्यावेळी शेकाप ता.चिटणीस धनराज गायकवाड, जेष्ठ नेते गोविंद शेठ भोईर, जेष्ठ सल्लागार गंगाराम साळवी, माणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य महेश सुर्वे, खरेदी विक्री संघ माणगावचे सभापती निलेशजी थोरे, आर डी सी बँक संचालक ज्ञानेश्वर भोईर, तळा नगरपंचायतचे युवा नेते लहुशेठ चव्हाण, पिटसई ग्रामपंचायत सदस्य दिलीप लोखंडे, नरेश मोरे, महादेव जगताप, युवा नेते विपूल शेठ उभारे सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन केले त्यांना पुढील वाटचाली करिता हार्दिक शुभेच्छा दिल्या.


जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती.सहनिजा बानो तन्वीर अहमद सय्यद, आमचे अशिल यांचे नावे असलेले शॉप नं.०२, तळमजला, प्लॉट नं.५, सेक्टर ६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९ नवी मुंबई. क्षेत्रफळ : १२२ चौ.फूट बिल्टअप. या सदर शॉपचे मुळ दस्त १) पॅजेशन लेटर २) अलॉटमेंट लेटर दि.०३/०२/२००४, ३) मॉरगेज करण्याची परवानगी लेटर दि.०२/०२/२००६, ४) करारनामाचे पावती क्रं.७२३ दि.३०/०१/२००४, ५) करारनामा मे.शिवसागर बिल्डर्स आणि डेव्हलपर्स आणि सय्यद लैला बानो व सहनिजा बानो तन्वीर अहमद सय्यद दस्त क्रं.७२३/२०४, दि.३०/०१/२००४ यांच्याकडून गहाळ झालेली आहे.

खालील परिशिष्टात नमूद केलेला सदर मिळकतीबाबत कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरुपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या पृष्ट्यर्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या रुमबाबतीत कोणाचाही व कसलीही हरकत असल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या रुम बाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**शॉप नं.०२, तळमजला, प्लॉट नं.५, सेक्टर ६, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०९, नवी मुंबई. क्षेत्रफळ १२२ चौ.फूट बिल्टअप**

**सही/-**
**ॲड.राजेश आर. चौधरी**
**शॉप नं.०८, कृष्णा टॉवर, सेक्टर ५ ई, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८**



राव साहेब

अर्जदारतर्फे वकील
(ॲड.प्रदीप एस. सावंत)

जाहीर नोटीस

मे.दिवाणी न्याया, वरिष्ठ स्तर सो.पनवेल यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१२११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/१०/२०२१

१) श्रीमती.रेखा सुनील कोटकर
वय वर्षे : ५८, धंदा : गृहिणी
२) श्री.तेजस सुनील कोटकर
वय वर्षे : ३२, धंदा : शेती / नोकरी
दोघेही रा.कोट नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — जाबदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी सामाईक मालक कै.सुनील बाळकृष्ण भोईर उर्फ कोटकर हे दि.१३/१०/२०२० रोजी मु.कोटनाका, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.सुनील बाळकृष्ण भोईर उर्फ कोटकर यांची आई कै.शारदा बाळकृष्ण भोईर उर्फ कोटकर ही देखील दि.१९/०७/२००३ रोजी मु.कोटनाका, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेली आहे. त्याअर्थी अर्जदार नं.१) श्रीमती.रेखा सुनील कोटकर, २) श्री.तेजस सुनील कोटकर यांनी खालील वर्णनाच्या सामाईक मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|
| काळाधोंडा | ११० | २६ | २ | 0.0२.0३ |
| | | २७ | ६ | 0.0२.0५ |
| | | ३२ | ६ | 0.0५.0३ |
| | | ३२ | १३ | 0.0६.0३ |
| | | ४२ | ६ अे | 0.0३.0५ |
| | | ५३ | १० अे | 0.0३.0५ |
| काळाधोंडा | ११२/८७ | ४४ | ११ | 0.0९.0१ |
| | | ५३ | १ | 0.0२.0८ |
| | | ५४ | २ | 0.0३.0५ |
| काळाधोंडा | ११०/८५ | ४० | ६ | 0.0६.0४ |
| | | ३५ | १ | 0.0४.00 |
| काळाधोंडा | ११२ | २६ | १० | 0.0४.0 |

वरील अर्जदार हे मयत कै.सुनील बाळकृष्ण भोईर उर्फ कोटकर यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि जर अर्जदार हे कै. सुनील बाळकृष्ण भोईर उर्फ कोटकर यांचे वारस असल्याचे शाबीत झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.११/१०/२०२१ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मे.सराफ मॅडम यांच्या कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल चौ.अर्ज क्र.९८७/२०२१
ने.ता.२०/११/२०२१

श्री.हसन इब्राहीम करके
वय : ६४ वर्षे, धंदा : काहीनाही
रा.वडघर, मुस्लीम मोहल्ला,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची मुलगी शमशाद हसन करके हिचा जन्म दि.०६/०६/१९८० रोजी मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी झालेला आहे.

वरील अर्जदार यांची मुलगी शमशाद हसन करके हिचा जन्म दि.०६/०६/१९८० रोजी मौजे : वडघर, ता.पनवेल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात शमशाद हसन करके हिचा जन्म दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. शमशाद हसन करके हिच्या जन्माबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांना जन्मदाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.११/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



मा.गोडसे सो

वकील श्री.संदीप शेरेगर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.९३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/११/२०२१

श्री सतेन्द्र कुमार त्यागी व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ हे कै.श्रीमती.उमा सतेन्द्र त्यागी यांचे पती आहेत. अर्जदार क्र.२ व ३ हे कै.श्रीमती.उमा सतेन्द्र त्यागी यांचे मुले आहेत. कै.श्रीमती.उमा सतेन्द्र त्यागी हे दि.१९/०५/२०२० रोजी KM-15/1104, JAYPEE KOSMOS, SECTOR-134, NOIDA, DADRI, GAUTAM BUDDHA NAGAR, UTTAR PRADESH येथे मयत झाले आहे. कै.श्रीमती.उमा सतेन्द्र त्यागी यांचा मालकीचा खारघर येथे फ्लॅट आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**रुम नं.टी-४/७०१, प्लॉट नं.0-६९, एस.के.पी.सोसायटी, सेक्टर १२, खारघर, पनवेल, जिल्हा : रायगड**

सदरहू मिळकती हे कै.श्रीमती.उमा सतेन्द्र त्यागी यांचे मालकीची आाहे. त्यांचे वरील वारस आहे.
दि.११/१०/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



कोर्ट : ५ श्री.ए.एम.मुजावर

वकील श्री.संदीप शेरेगर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१२३८/२०२१
नि.नं.८
ने.ता.२९/१०/२०२१

सोनाली मंगेश जगताप व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कै.मंगेश जनार्दन जगताप हे दि.०२/११/२०१७ रोजी गोवंडी झेन रुग्णालय येथे मयत झाले आहेत. कै.श्री.मंगेश जगताप यांचे मृत्यूपश्चात अर्जात नमूद केलेल्या मिळकत हे त्यांच्या वारसांच्या नावे सोनाली जगताप, भाग्यश्री जगताप, साक्षी जगताप, ध्रुव जगताप सदरच्या अर्जात दिलेली आहे.

**सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-**
**रुम नं.बी/१०४, हेरंबा को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर ८ ई, कळंबोली, पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील अर्जदार हे कै.मंगेश जनार्दन जगताप यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.मंगेश जनार्दन जगताप यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## श्रीवर्धनमध्ये बंदचा फज्जा, सर्व व्यवहार सुरळीत सुरू

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : राज्यातील महा विकास आघाडी सरकारने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदचा श्रीवर्धन तालुक्यात तरी फज्जा उडालेला पाहायला मिळाला.

राज्य परिवहन महामंडळाच्या लोकल फेर्या सुरू होत्या. त्याचप्रमाणे तीन आसनी व सहा आसनी रिक्षा देखील सुरू असल्याचे पाहायला मिळत होते. श्रीवर्धन बाजारपेठ सोमवारी बंद असते. त्यामुळे कपड्यांची व किराणामालाची दुकाने सोमवारी बंद असतात. मात्र बाजारातील इतर सर्व दुकाने आज उघडी असलेली पाहायला मिळाली. भाजीपाला, चिकन-मटण, मच्छी इत्यादी मार्केट देखील उघडे होते. राज्यात सत्तेवरती असलेल्या महाविकास आघाडी सरकारला बंद पूकारावा लागतो ही गोष्ट बहुसंख्य नागरिकांना कळलीच नाही. ज्या सत्ताधार्यांनी राज्य चालवायचे असते त्यांनीच बंद पुकारला याबाबत सर्वांना कुतूहल वाटत होते. श्रीवर्धन तालुक्यातील बँका, निमशासकीय व शासकीय कार्यालये नियमितपणे सुरू होती. श्रीवर्धनचे पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन तालुक्यामध्ये पोलिस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. एकूणच श्रीवर्धन तालुक्यात तरी बंदचा फज्जा उडालेला पाहायला मिळाला.

## तळा तालुका पेन्शनर संघटनेची सभा संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका सेवा निवृत्त कर्मचारी संघटनेची सर्व साधारण सभा जेष्ठ सभासद मारूती शिर्के गुरुजी यांच्या निवासस्थानी १० आँक्टो रोजी संपन्न झाली. या सभेला बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. गेल्या वर्षभर कोरोना महामारीचे संकट असल्याने शासनाच्या आदेशाचे पालन करून सभा घेण्यात आली नव्हती. राज्य संघटनेच्या परवानगीने भरविण्यात आली. यावेळी दिवंगत सदस्य व नातेवाईक, माजी सैनिक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. वर्षभरापासून संघटनेच्या प्रलंबित समस्यांची माहिती, उपाययोजना कार्यवाहीचा आढावा त्याचबरोबर राज्य सरकारच्या महागाई भत्ता पेन्शनची नियमावली अध्यक्ष भानू स. मंचेकर गुरूजी यांनी विषद केली. व नवीन सदस्य नामदेव तांबडे गुरुजी श्रीमती रातवडकर यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेच्या आदर्श शिक्षक पुरस्कार (माध्यमिक) मनोज भाऊ सुतार यांचा विशेष सन्मान शाल श्रीफळ गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. जेष्ठ सदस्य मारूती शिर्के गुरुजीयांचा ८० वा.वाढदिवस सपत्नीक, श्रीफळ गुलाब पुष्प देऊन साजरा करण्यात आला.

# लखीमपुर खिरी घटनेच्या निषेधार्थ म्हसळा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

उत्तर प्रदेशातील लखीमपुर खिरी येथे अन्नदाता शेतकरीराजा न्याय हक्कासाठी केंद्र सरकारच्या दारी शांततेत व अहिंसा मार्गाने आंदोलन करीत असताना शेतकऱ्यांचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी सरकार मधील घटक हिंसेचा मार्ग अवलंबून शेतकऱ्यांची हत्या करीत आहे. सदर घटनेचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार मधील महाविकास आघाडीतील पक्षांनी स्वतंत्र पणे सहभागी होऊन म्हसळा बाजारपेठ बंद ठेवून लखीमपुर घटनेचा जाहीर निषेध केला आहे.



भारतातील शेतकरी गेली अनेक महिने आपल्या न्याय व हक्कासाठी केंद्रातील मोदी सरकार कडे शांततेत आंदोलन करून आपले म्हणणे सरकारपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करीत आहेत परंतु शेतकऱ्यांचे आंदोलन भाजप सरकार वेळोवेळी दाबण्याचा व भरकटविण्याचा प्रयत्न करीत आहे असे असताना केंद्र सरकारला त्यात यश लाभत नसल्याने हताश होऊन बसले आहे. देशातील अन्नदात्याचा आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मोदी सरकार साम, दाम, दंड, भेद आणि दहशत निर्माण करून शेतकऱ्यांना संपविण्याचा घाट घातला आहे. नुकतीच उत्तर प्रदेशात शेतकरी आंदोलन सुरू असताना लखीमपुर येथे मंत्री महोदयांच्या मुलाने चार शेतकऱ्यांना गाडी खाली चिरडून ठार मारण्याची आणि अनेकांना जखमी करण्याची निंदनीय घटना घडली आहे त्याचे निषेधार्थ महाराष्ट्र राज्यातील महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्र बंद करण्याचा निर्णय घेतला असता म्हसळा तालुक्यातील सर्वपक्षीय नागरिकांनी व व्यापारी वर्गाने जाहीर पाठींबा देवुन बंद मध्ये सहभाग नोंदवला. म्हसळा तालुक्यातील मविआ सरकार मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, काँग्रेस आणि शेकापच्या प्रमुखांनी लखीमपुर येथे घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध नोंदविण्यासाठी निदर्शने करून म्हसळा तहसीलदार समीर घारे यांच्याकडे केंद्र सरकारला जाग यावी यासाठी वेगवेगळे निषेधपत्र देण्यात आले आहेत.

म्हसळा तालुक्यातील महा विकास आघाडीत बिघाडी, राष्ट्रवादी काँग्रेसला डावलून शिवसेना, काँग्रेस, शेकाप एकत्र आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष समीर बनकर यांच्या अध्यक्षतेखाली वरील घटनेचा निषेध व्यक्त करून पक्षाच्या मार्फत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले तर तालुक्याचे माजी शिवसेना प्रमुख महादेव पाटील, काँग्रेस अध्यक्ष मुविज शेख, शेकाप तालुका चिटणीस संतोष पाटील यांनी एकत्रितपणे आघाडी करून निषेध व्यक्त केला आहे.

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता असली तरी म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस मोठा पक्ष असल्याने आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पंचायत, ग्राम पंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला रोखण्यासाठी शिवसेना, काँग्रेस आणि शेकाप आत्ताच एकत्रित येवुन वेगळी चुल मांडत असल्याचे व तशा प्रकारे पुढील राजकीय कामाला सुरुवात झाली असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

# आदिमाया स्वरूपात असलेल्या स्वामींचे अभिनेत्री विजया बाबर यांनी घेतले दर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये पनवेलमध्ये गावदेवी पाडा असलेला श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) येथे गेल्या अनेक वर्षापासून स्वामींचे आदिमाया स्वरुपात दर्शन स्वामी सेवकांना देण्यात येते. त्याचे प्रत्यक्ष दर्शन कलर्स मराठी वाहिनी वर जय जय स्वामी समर्थ या मालिकेत चंदा ही भूमिका सदर करणारी अभिनेत्री विजया बाबर यांनी घेतले. यावेळी त्या भारावून गेल्या होत्या.



पनवेलमधील श्री स्वामी समर्थ मठ हा अत्यंत जागृत असून या ठिकाणी पनवेलसह रायगड जिल्ह्यातून तसेच ठाणे, नवी मुंबई, मुंबईमधून व उपनगरातून मोठ्या प्रमाणात स्वामी सेवक येथे येत असतात. दरवर्षी येथे वेगवेगळे सण,उत्सव साजरे करण्यात येतात. नवरात्रीच्या नऊ दिवसामध्ये येथील मठाधिपती सुधाकर (भाऊ) घरत व त्यांचे कुटुंबिय स्वामींना वेगवेगळ्या प्रकारच्या आदीमायींच्या स्वरुपात साकारतात व त्यांचे दर्शन घेण्याकरिता दुरवरुन भक्त येत असतात. या ठिकाणी स्वामी सेवक महिला मंडळ यांच्यामार्फत दिवसभर स्वामी सेवा सुरू असते. त्यामध्ये भजन, किर्तन, महाप्रसाद आदी या नऊ दिवसात सुरु असते. कोरोनाचा कालखंड कमी झाल्यामुळे आता मंदिरे खुली करण्यात आली आहेत. अनेकांना अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांचे दर्शन अक्कल कोट येथे जावून घेता येत नाही. परंतु तेच भक्त या ठिकाणी येवून स्वामींची सेवा करतात व बोललेले नवस फेडतात. त्यातच स्वामी महाराजांच्या तसबीरला नवरात्रीत नऊ दिवस निरनिराळ्या रंगाच्या वस्त्रांमध्ये आदिमायांचे स्वरुप दिले जात असल्याने व विविध अलंकाराने सजविले जात असल्याने त्यांचे सौंदर्य अजूनच खुलते.

# महाराष्ट्र बंदकडे सुधागडात महाविकास आघाडीने फिरवली पाठ



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी येथे शेतकऱ्यांच्या विरोधात झालेल्या हिंसाचाराच्या विरोधात व केंद्र सरकारकडून लादण्यात आलेल्या तीन कृषी कायद्याच्या विरोधात रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद पाळण्यात आला. अत्यावश्यक सेवा वगळता शहरातील सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवून बहुतांश दुकान मालकांनी या बंदला पाठिंबा दर्शविला आहे. मात्र सुधागड तालुक्यात महाराष्ट्र बंदच्या हाकेकडे महाविकास आघाडीतील शिव-सेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेन पूर्णपणे पाठ फिरवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

सुधागड तालुक्यातील मुख्य व मोठी बाज-ारपेठ म्हणून ओळखली जाणारी पाली बाजारपेठ सकाळपासून सायंकाळ पर्यंत खुली होती. येथील सर्व दुकाने व व्यवहार सुरू होते. याबरोबरच परळी व पेडली या बाजारपेठ मधील दुकाने देखील मोठ्या प्रमाणात खुली असल्याने नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. भाजपचे दक्षिण जिल्हाध्यक्ष ॲड महेश मोहिते यांनी बंदमध्ये कुणीही सहभागी होऊ नये असे आवाहन केले होते. त्यामुळे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बंदकडे कानाडोळा केला, सुधागड तालुक्यात शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, शेतकरी कामगार पक्ष हे सक्रिय आहेत. सुधागडात बंद पाळला जाईल का?अशी सार्यांना उत्सुकता होती मात्र सुधागड तालुक्यात महाराष्ट्र बंद च्या हाकेला प्रतिसाद मिळाला नसल्याचे चित्र दिसून आले.

# २० ट्रेलर मिळून ४ कोटीचा केला एका इसमाने अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी विश्वासाने भाड्याने दिलेले २० ट्रेलर ज्याची आजमितीस बाजारी किंमत जवळपास ४ कोटी रुपये इतकी आहे. ते ट्रेलर भाड्याने न लावता सदर कंपनीला फसवून त्या ट्रेलरचा अपहार केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अमित अग्रवाल यांच्या ताब्यात असलेले २० ट्रेलर हे भाड्याने रेबारी टेम्पो सर्व्हीस कंपनी, पुरणसिंग रेबारी, अशोक रेबारी तसेच त्याच्या सोबत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या इसमांनी हे २० ट्रेलर ताब्यात घेवून ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी विश्वासाने भाड्याने लावतो असे सांगून त्यानंतर सदर ट्रेलरचे भाडे न देता त्याचप्रमाणे सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि. या कंपनीला परत न देता स्वतःच्या फायद्याकरिता ताब्यात ठेवून त्याचा अपहार केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तलवार जवळ बाळगल्याप्रकरणी एकास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घातक हत्यार तलवार जवळ बाळगली म्हणून एकास तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये बॉम्बे बिअर कंपनीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या रस्त्यावर एका इसम त्याच्या ताब्यात बेकायदेशीररित्या घातक असे तल-वार बाळगून असल्याची माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे वपोनि काशिनाथ चव्हाण यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.(गुन्हे) किंद्रे, सपोनि बाळासाहेब शिंदे, राजेंद्र जाधव, पो.कॉ. संदेश उतेकर आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जावून आरोपी लक्ष्मण सुभाष राठोड उर्फ वाघ्या उर्फ लकी याला तल-वारीसह ज्याची किंमत जवळपास १२०० रुपये इतकी आहे ताब्यात घेतले आहे व त्याच्या विरोधात भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ सह म.पो. कायदा कलम ३७ (१), १३५ प्रमाणे कारवाई केली आहे.


### जोरदार हरकत नोटीस

**प्रति,**
**ॲड.कांचन एस. पाटील**
**रा.१३३७ डी, रुम नं.२, हिराजी पाटील**
**निवास, प्रभुआळी, जुने पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

आमचे अशिल मनिबाई गंगा धनगर उर्फ बावदाने, मयत भागाबाई कानू घाटे यांची मुले कोंडू कानू घाटे, धोंडू कानू घाटे रा.सारसई, पो. आपटा, ता.पनवेल, जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन आपणांस नोटीसला हरकत कळविण्यात येते की,

आमचे अशिल हे कै.गंगा जानू धनगर उर्फ बावदाने व कै.गंगाबाई गंगा धनगर उर्फ बावदाने यांचे कायदेशीर वारसदार आहे. आमचे अशिलांच्या वडिलांच्या नावांवर

**मौजे : घेराकिल्ला माणिकगड, ता.पनवेल येथील**

| स.नं./ग.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ३०/० | १६.३९.00<br>पो.ख. १.८६.00<br>१८.२५.00 | ३८.00 |

मिळकती १९५६ पासून नावांवर आहेत. हे कागदपत्र पाहिल्यावर सहज लक्षात येते. आमचे अशिल हे धनगर समाजाचे आहेत. आमचे अशिलांकडे तसे पुरावे देखील आहेत. आमचे अशिल आज ही सदरील जमीन कसत आहेत. आमचे अशिलांचे सदरील जमिनी जवळ वास्तव आहे. तसा पुरावा देखील आमचे अशिलांकडे आहे. आमचे अशिल हे शिक्षित नसल्याचा फायदा घेवून आमचे अशिलांच्या जमिनीच्या कागदाची जी काही हेराफेरी केली आहे त्या संदर्भात आमचे अशिल तुमचे अशिलांविरुद्ध फौजदारी ४२० गुन्हा दाखल करणार आहेत. तसेच तुमचे अशिलांस असे करण्यास ज्या वरिष्ठ अधिकाऱ्याने मदत केली आहे त्याविरुद्ध देखील कोर्टामध्ये दाद मागणार आहेत.

तरी सदरील हरकत मिळतास तुम्ही तुमचे अशिला मार्फत जमिनीची व्यवहार करणार आहात तो त्वरित थांबवावा. सदरील नोटीसला हरकत घेवून जरी तुम्ही तुमचे अशिलाने दिलेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे व्यवहार पूर्ण केल्यास सदरील व्यवहार संदर्भात जे काही कागदपत्र तयार करण्यात येतील ते आमचे अशिलांवर बंधनकारक नसणार आहेत. तसेच सदरील व्यवहार संदर्भात आमचे अशिल तुमचे अशिलांविरुद्ध फौजदारी व दिवाणी कार्यवाही करतील त्या सर्व कार्यवाहीस तसेच परिणामास जबाबदार तुमचे अशिल असतील याची नोंद घ्यावी.

सदरील दि.२९/०९/२०२१ ला तुम्ही प्रसिद्ध केलेल्या पेपर मधील नोटीसला आमचे अशिलांची जोरदार हरकत आहे.

या नोटीसचा खर्च तुमचे अशिलांवर ठेवून सदरील नोटीसची हरकत प्रसिद्ध करण्यात देण्यात आली आहे.

पनवेल
दि.११/१०/२०२१

**सही/-**
**ॲड.प्रमिला मोरेश्वर ठाकूर**
**रा.श्री.विशाल सदानंद पाटील, आशिर्वाद बिल्डींग, रुम नं.२, उगमनगर, जुना ठाणा नाका रोड, श्री साई ब्लड बँकेच्या मागे, पाण्याच्या टाकी जवळ, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८८१९२३०३०**



मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदार तर्फे वकील
ॲड.निवृत्ती बी. पावशे
ॲड.एस.व्ही.क्षिरसागर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१३३५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/११/२०२१

१) कु.झिशान ईकबाल इनामदार
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.के.एल-५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली-४१०२०१८, ता.पनवेल, जि.रायगड
२) कु.साहिल ईकबाल इनामदार
वय : २२ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.के.एल-५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली-४१०२०१८, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हिना ईकबाल इनामदार
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.के.एल-५/३२/०१, सिडको कॉलनी,
से.३ ई, कळंबोली-४१०२०१८, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, ज्याअर्थी कै.ईकबाल अजिजभाई इनामदार हे रा.के.एल-५/३२/०१, सिडको कॉलनी, से-३ ई, कळंबोली-४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी होते व ते दि.२२/०५/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. त्याअर्थी अर्जदार यांनी कु.झिशान ईकबाल इनामदार व इतर यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**परिशिष्ट 'अ'**

**सदनिका नं.७०३, ए विंग, सातवा मजला, हेरंबा को.ऑप.हौ.सोसा. लि. प्लॉट नं.११, से.८ ई, कळंबोली नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ६१.९९ चौ.मी. बिल्टअप + ५.३९ चौ.मी. टेरेस ही सदनिका आहे.**

**परिशिष्ट 'ब'**

**के.एल-५/३२/०१, से-३ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ३३.२१ चौ.मी. बिल्टअप + २४.00 चौ.मी. कारपेट**

**परिशिष्ट 'क'**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका सुधागड, तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या व पंचायत समिती सुधागड ह्यांचे हद्दीतील आणि मे.सब रजिस्टार सो.सुधागड ह्यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे : गोंडळे, सुधागड, जि.रायगड, तलाठी सजा नांदगाव ग्रामपंचायत, ता.सुधागड, जि.रायगड येथील रेव्हेन्यू रेकॉर्डप्रमाणे असून सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : गोंडाळे, ता.सुधागड, जि.रायगड येथील**

| स.नं.गट भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २८ | - | १-५७-0<br>0-३७-0<br>१-९५-0 | 0-५0 |

**परिशिष्ट 'ड'**

**सदनिका नं.०९, बिनशेती प्लॉट-ग.नं.२२१/९, साई पार्क या रहिवासी सदनिकांच्या स्किम मधील, ब्लॉक 'सी' या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील या सदनिकेचे चटई क्षेत्रफळ ७२७.९५ चौ.फूट (६७.६५ चौ.मी.) मौजे : साकुरी, ता.राहता, जि.अहमदनगर.**

वरील अर्जदार हे मयत कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांचे कायदेशीर वारसदार आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी सपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर कै.ईकबाल अजिजभाई इनामदार यांचे वारस असल्याचे शाबीत णल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.११/१०/२०२१ रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



### पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां./२२२१/३०६६/२०२१ दि.०८/१०/२०२१

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १६ | फा.प्लॉट नं.२८५, सदनिका क्र.५०४ गुरुशरणत, अमृत बि, तक्का, पनवेल | मोहन बाबु अगरवाल सन ऑफ चंद्रभान अगरवाल | शुभयू गुप्ता सन ऑफ अभिजीत गुप्ता शुभ्रा गुप्ता वाईफ ऑफ अभिजीत गुप्ता |
| २ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१, २, गाळा क्र.१ कच्छी मोहल्ला, पनवेल | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ३ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१,२ गाळा क्र.२ कच्छी मोहल्ला, पनवेल | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ४ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१,२ पनवेल सदनिका क्र.१०१, कच्छी मोहल्ला | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ५ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१,२ पनवेल सदनिका क्र.२०१, कच्छी मोहल्ला | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ६ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१,२ पनवेल सदनिका क्र.३०१, कच्छी मोहल्ला | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ७ | १ | प्रॉपर्टी क्र.२१३, २१३/१,२ पनवेल सदनिका क्र.४०१, कच्छी मोहल्ला | महमंद सालेह इब्राहीम नावडेकर | नाझीम महमंद सालेह नावडेकर, गझनफर महंमद सालेह नावडेकर |
| ८ | १६ | फा.प्लॉट नं.२८५, सदनिका क्र.६०४ गुरुशरणम सो. (अनुराग), पनवेल | अलका रवींद्र आटवणे व इ. | मुन्नाराम दानाराम बेरड |
| ९ | १० | प्रॉपर्टी क्र.१२६८, गाळा क्र.०४ सचिन अपार्टमेंट, पनवेल | अशोक पांडुरंग गोजे | द्वारका प्रसाद रामेश्वरलाल पारीक |
| १० | १६ | फा.प्लॉट नं.४४८, सदनिका क्र.३०३ मोराज, तक्का, पनवेल | विठ्ठल बाबुराव कोरे | हेमलता जगन्नाथ शेट्टी जगन्नाथ वासाप्पा शेट्टी |
| ११ | | टेंभोडे-३७१/अ | नामदेव सदाशिव पाटील | सुरज अशोक गायकवाड |
| १२ | | टेंभोडे-३७१/ब | नामदेव सदाशिव पाटील | सुरज अशोक गायकवाड |
| १३ | | कोयनावेळे-१०६ | राजाराम मारुती कदम | प्रशांत राजाराम कदम |
| १४ | | तळोजा मजकूर-३९२, १३० | पंढरीनाथ कान्हा पाटील | धनश्री प्रमोद म्हात्रे |
| १५ | | पेणधर-१७२ | धनपाल बाबुराव भोईर | सागर गजानन भोईर |
| १६ | | कामोठे-घर क्र.१८१ अ | अनंता हरिभाऊ गायकर | रेवताबाई अनंता गायकर लक्ष्मी संतोष भोपी |
| १७ | | कामोठे-घर क्र.२५ अ | शेवंती आत्माराम म्हात्रे | इंदिरा महादेव भोपी, गीता हरेश शेळके |
| १८ | | नावडे-१२८ | अरविंद पुंडलिक म्हात्रे | पुष्कराज अरविंद म्हात्रे |
| १९ | | नावडे-W-१७/१८ | कला ज्योती प्रोसेस | मे.नेटको फार्मा लि. |
| २० | | पडघे-B-५५, J-७,८,९ | एम.आर.ब्रदर्स ॲण्ड असोसिएट को.ऑ.सोसायटी | मोनल निमेश श्रॉफ |
| २१ | | पडघे-B-५३, J-७,८,९ | एम.आर.ब्रदर्स ॲण्ड असोसिएट को.ऑ.सोसायटी | मोनल निमेश श्रॉफ |
| २२ | | पडघे-B-५४, J-७,८,९ | एम.आर.ब्रदर्स ॲण्ड असोसिएट को.ऑ.सोसायटी | मोनल निमेश श्रॉफ |
| २३ | | तुर्भे-२४३ | हरिभाऊ रामचंद्र मढवी | केशव अनंत मढवी |
| २४ | | तुर्भे-७२ | हरिभाऊ रामचंद्र मढवी | केशव अनंत मढवी |
| २५ | | रोहिंजण, खुटारी-१८१, ४३२ | मुकूंद जाणू म्हात्रे | प्रभात मुकूंद म्हात्रे, मोसमी नितीन पाटील, मोनिका अनिल म्हात्रे, श्वेता समीर पाटील, अक्षता विकास धुमाळ |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# संक्षिप्त...

## मार्केट यार्ड पनवेल येथे लसीकरण शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

९ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी पनवेल महानगरपालिकेच्या मिशन कवच कुंडल अंतर्गत कोविड-१९ मोफत लसीकरण शिबिराचे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते.

मार्केटयार्ड परिसरातील नागरिकांना पनवेल महानगरपालिकेचे कोविड-१९ मोफत लसीकरण अंतर्गत लाभ मिळण्यासाठी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी त्यांच्या स्वतःच्या अध्यक्ष असलेल्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या कार्यालयामध्ये पनवेल महानगरपालिकेचे मोफत लसीकरण शिबिर आयोजित करून सहकार नगर, पंचरत्न चौक, मार्केट यार्ड परिसरातील राहणारे इतर रहिवासी यांच्यासाठी शिबिराचे आयोजन केले. पनवेल महानगर पालिकेला आपल्या स्वतःची ऑफिसची जागा देऊन मोफत लसीकरण करून दिल्याबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांचे आभार व्यक्त केले.



## १३ लाखांची वीज चोरी, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

किरवली गाव येथे प्लास्टिक दाना बनवण्याच्या कारखान्यात तब्बल १३ लाखांची वीजचोरी पकडण्यात आली आहे याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरवली टोल प्लाझा जवळ पनवेल मुंब्रा रोड येथे प्लास्टिक दाणा बनवण्याच्या कारखान्यात वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. त्यानुसार महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी पाहणी केली. अनधिकृतपणे मीटरमध्ये फेरफार करून वीज पुरवठा वापरून तो स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरला व महावितरणचे गेल्या सहा महिन्यांपासून ६५ हजार ७०३ युनिटचे नुकसान केले व १२ लाख ९६ हजार ७० रुपयांची वीज चोरी करून महावितरणचे आर्थिक नुकसान केले.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# लखीमपूर येथील घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडी सरकारच्या भारत बंदला मुरुडमध्ये प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

लखीमपूर खेरी दंगल हिंसाचार प्रकरणी राज्यातील महाविकास आघाडी सरकारने दिलेल्या महाराष्ट्र बंद च्या हाकेला मुरुड मधील व्यापा-यांनी आपली दुकाने बंद ठेवून प्रतिसाद मिळाला.

उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी येथे लखीमपूर खेरी हिंसाचार प्रकरणात केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांना तातडीने आपल्या पदावरुन हटवावे आणि त्यांचा मुलगा आशिष मिश्राला अटक करण्याच्या मागणीसाठी राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीच्यावतीने आज सोमवारी ११ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती.या बंदमध्ये सत्ताधारी शिवसेना,राष्ट्रवादी, काँग्रेससह शेतकरी,कामगार आघाडीतील सर्वच घटक पक्षांनी पाठिंबा दिला होता. उत्तर प्रदेशमधील लखीमपूर खेरी येथे शेतकर्यांना गाडीखाली चिरडून मारण्याच्या घटनेविरोधात महाराष्ट्रातील महाविकास आघाडीने राज्यव्यापी बंदी हाक दिली. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्यासह महसूलमंत्री बाळासाहेब थोरात आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्याच आठवड्यात संयुक्तपणे पत्रकार परिषद घेत याची घोषणा केली होती. त्यानुसार आज ११ ऑक्टोबरला राज्यव्यापी बंद पाळला गेला. लखीमपूर येथील घटनेच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडी तर्फे पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंद ला मुरुड मध्ये प्रतिसाद मिळाला.



मुरुड शहरातील बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने काही वेळ बंद ठेवून बंद ला पाठिंबा दिला होता. शिवसेना तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत बाजारपेठेत बंद यशस्वी होण्यासाठी आवाहन केले होते. यावेळी महिला संघटक शुभांगी करडे, विजय वाणी आदींनी लखीमपूर येथील घटनेचा निषेध करुन दोषींवर कारवाईची मागणी केली. शिवसेना तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उपतालुकाप्रमुख मनोज कमाने, शहर प्रमुख प्रशांत कासेकर, उपशहर प्रमुख विजय वाणी, महिला आघाडी संघटक शुभांगी करडे, उपशहर प्रमुख उत्कर्षा धोत्रे, युवा सेना अधिकारी दिपेश वरणकर, शाखा प्रमुख सुनील शेळके, माजी शहरप्रमुख बाळकृष्ण गोंजी, नगरसेवक प्रमोद भायदे, पांडुरंग आरेकर, नगरसेविका युगा ठाकूर, गटप्रमुख वंदेश पाटील, विभाग प्रमुख सुनील नाक्ती, कुणाल सतविडकर, मनोज कमाने, शाखा प्रमुख प्रदीप वाजे,बिलाल दर्जी, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

बोर्लीनाका येथे महाविकास आघाडी तर्फे पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी तालुका काँग्रेस कमिटी चे कार्याध्यक्ष असगर दळवी यांनी सांगितले कि, लखीमपूर येथे उपोषणकर्त्या शेतकऱ्यांना केंद्रीय गृहराज्यमंत्री अमित मिश्रा यांच्या मुलाने ज्या शेतकऱ्यांची गाडी खाली चिरडून हत्या केली हे कृत्य लोकशाही ला काळिमा फासणारे असून यामुळे आपला भारत देश मोदी सरकारच्या राजवटीत अराजकते कडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येते आहे. म्हणून उतर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ व केंद्रीय गृहराज्यमंत्री अमित मिश्रा यांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा. अशी मागणी केली आहे.

यावेळी महाविकास आघाडी तर्फे भगीरथ पाटील, निलेश घाटवळ, नौशाद दळवी, इकबाल घारे, खलिल नाईक, धर्मेंद्र गायकवाड, जाकीर हमदुले, बशीर गोरमे, सलीम तांडेल, अजय सोडेकर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवरात्रौत्सवानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घेतले दुर्गामातेचे दर्शन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवरात्रौत्सवानिमित्त उलवा नोड मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उत्सवात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दुर्गामातेचे दर्शन घेतले.

जय बजरंग कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ (कोपर), रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व तामिळ संघम सेक्टर १९, लांगेश्वर मित्र मंडळ मोरावे आणि व्यापारी एकता मित्र मंडळ मोरावे यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या उत्सवाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आयोजकांच्यावतीने स्वागत व सत्कार करण्यात आले.

यावेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, कोळी समाजाचे नेते उत्तम कोळी, युवा नेते मदन पाटील, निलेश खारकर, नितेश म्हात्रे, विशाल म्हात्रे, राजू खारकर, शैलेश भगत, अनुसया घरत, प्रिया अडसुळे, आरती तिवारी, प्रियांका शिंदे, कृष्णा सगादेवन, शेखर नडार, शिवकुमार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उत्तर प्रदेशातील लखमीपूर येईल घटनेच्या निषेधार्थ तळा बाजारपेठ बंद

**दै.रायगड नगरी । किशोर पितळे**

**तळा** : उत्तर प्रदेशातील घटनेचा निषेध म्हणून तळा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी दुप-ारी एक वाजेपर्यंत आपली दुकाने बंद ठेऊन निषेध नोंदवला. उत्तर प्रदेशातील लंखिमपूर येथे निष्पाप शेतकऱ्यांना चिरडणाऱ्या भाजपच्या केंद्रीय गृहमंत्र्याच्या पुत्रावर कडक कारवाई करून निष्पाप शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या मागणी करिता महायुतीने पुकारलेल्या बंदमध्ये तळा शहरातील व्यापाऱ्यांनी सहभाग घेतला.

सोमवारी संपूर्ण दिवस बाजारपेठ बंद करण्यासंदर्भात शिवसेनेकडून व्यापाऱ्यांना पत्र देण्यात आले होते. त्यावर निर्णय घेण्यासाठी शहरातील स्टेट बँकेच्या वर असलेल्या मंगल कार्यालयात बाजारपेठेतील सर्व व्यापाऱ्यांची बैठक पार पडली या बैठकीमध्ये उत्तर प्रदेशातील घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. परंतु लॉकडाऊन काळापासून व्यापाऱ्यांना वारंवार आपली दुकाने बंद ठेवावी लागली असून अनेक कारणांमुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. त्यातच सध्या नवरात्रोत्सव सुरू असल्याने ग्राहकांची गैर सोय व्हायला नको यासाठी पूर्णवेळ बाजारपेठ बंद न ठेवता एक वाजेपर्यंत अर्धा दिवस बाजारपेठ बंद ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार सोमवारी मेडिकल, दूध हे अत्यावश्यक सेवेतील दुकाने वगळता ईतर सर्व व्यवसाय दुपारी एक वाजेपर्यंत पुर्णतः बंद ठेवण्यात आले होते.



# मंगळवारी गव्हाण कोपर येथे शासकीय दाखले वाटप शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या मागणीनुसार गव्हाण कोपर येथील छत्रपती शिवाजी हायस्कुलमध्ये मंगळवार दिनांक १२ ऑक्टोबर रोजी शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

रेशनकार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, डोमासाईल, आधारकार्ड, वय व अधिवास, अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांना पनवेल तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात, अशा परिस्थितीत वेळ आणि आर्थिक भुर्दंड पडत असतो,

त्यामुळे नागरिकांचा हा त्रास वाचविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी पन-वेलचे तहसिलदार विजय तळेकर यांची भेट घेऊन शासकीय दाखले वाटप शिबीर आयोजित करण्याची मागणी केली होती. त्या मागणी नुसार ग्रामीण व शहरी भागात सहा ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने खारघर, सुकापूर, कळंबोली, आजिवली व कामोठे येथे दाखले वाटप शिबीर पार पडले. गव्हाण कोपर येथील छत्रपती शिवाजी हायस्कुलमध्ये होणाऱ्या या शिबिरामध्ये रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, डोमासाईल, वय व अधिवास दाखला, रहिवासी दाखला, जातीचा दाखला, शालेय विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड नोंदणी व दुरुस्ती आदी सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध होणार आहेत.

## बायोडिझेलच्या साठा करून विक्री ; गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । उरण**

विनापरवाना बायोडिझेलचा साठा करून त्याची वाहनांना विक्री केल्याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उरण तालुका हद्दीत बायोडीझेलची अवैधरित्या विक्री होत असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक सोमनिंगा बिराजदार यांना मिळाली होती. त्यानुसार उरण पनवेल जेएनपीटी रोडच्या बाजूला चिरले, कुणाल यार्डच्या बाजूला मोकळ्या जागेत दोन इसम बायोडिझेलची विक्री करत असल्याचे आढळून आले. राहुल प्रकाश देशमुख व कल्पेश माने हे कादिर नावाच्या इसमाच्या सांगण्यावरून बायोडिझेलची विक्री करत होते. त्यांना बायोडिझेल विकण्याचा परवाना दाखवण्यास सांगितले असता त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नव्हता. बायोडिझेल हा ज्वलनशील पदार्थ असून देखील या ठिकाणी कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना केलेली दिसून आली नाही. या ठिकाणी सात हजार लिटर बायोडिझेल सापडून आले आहे.


महाराष्ट्र शासन

### महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल
### ई-निविदा क्र. ४९ सन २०२१-२२ (फेर निविदा-१)

खालील कामाच्या ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल दुरध्वनी क्रमांक०२२/२७४५२७७८ हे महाराष्ट्र शासना कडील योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारां कडुन मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल यांचे कडुन दिनांक १२.१०.२०२१ ते २२.१०.२०२१ पर्यंत १०.०० ते १८.०० वाजे पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या निविदा दिनांक २५.१०.२०२१ रोजी त्यादिवशी ११.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्य झाल्यास त्या दिवशी उघडतील.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत किंमत (रु.लक्ष) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमुना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 1 | Repairs and maintainance of C.D Work from to Jawahar Wada Murbad Karjat Chowk Lohop Road (SH 79) km.124/500 TO 132/800 Tal. Khalapur Dist. Raigad. | 9.07 | 9000.00 | 01 Months | B-1 | 600/- | VII & above |
| 2 | FDR to Dahiwali Devpada Ware Kurung Wanjarwadi Nandgaon Road, MDR-103 in km 22/800 to 24/00, Taluka - Karjat, District – Raigad. | 9.88 | 10000.00 | 01 Months | B-1 | 600/- | VII & above |

टिप :-

१. तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

२. कोणतेही एक अगर सर्व निविदापत्रके कोणतेही कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. कोरे निविदापत्रक घेण्याकरिता केलेल्या अर्जासह वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग,
पनवेल



### पनवेल महानगरपालिका
### ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां./२२२१/३०६७/२०२१ दि.०८/१०/२०२१

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | पेणधर B-८ | पावरीका लि. | क्वॉर्टर फोल्ड प्रिंट टॉबीलटीज प्रा.लि. |
| २ | | तळोजा मजकूर १०६ | रघुनाथ हासू पाटील | सतीश बाबुराव पाटील |
| ३ | | कोयनावेळे २२७ | दशरथ बाबू पाटील | गणूबाई उर्फ गणीबाई दशरथ पाटील |
| ४ | | कळंबोली १७२ अ | वनाबाई भगवान नाईक | बारशी मंगलदास वाघ, रंजना बाळाराम कातकरी, सुनिता दिपक नाईक, अनिता मच्छिंद्र नाईक, कविता लक्ष्मण वाघमारे |
| ५ | | वळवली ४७० अ | मच्छिंद्र लहू म्हात्रे | पवन गोवर्धन पाटील |
| ६ | | रोडपाली ८१९ ब | मबुबाई दत्तू पाटील | राघो गोविंद पाटील |
| ७ | | आसुडगाव ७५ | भगवंत महादेव गायकवाड | जयदीप भगवंत गायकवाड |
| ८ | | तळोजा पाचनंद १८२१ | चंद्रकांत सुकीर पाटील | अरविंद शंकर जितेकर |
| ९ | | तळोजा पाचनंद ०३ | रजाक युसूफ मुल्ला | इसा अ.रजाक पटेल |
| १० | | तळोजा पाचनंद १४० | अब्दुल रशिद महमद अब्दुल्ला पटेल | जहीर अहमद अब्दुल रशिद पटेल, इल्यास अब्दुल रशिद पटेल, मुक्तदीर अब्दुल रशिद पटेल, लुकमान अब्दुल रशिद पटेल |
| ११ | | तळोजा पाचनंद ५०६ | अ.गफूर अमीरमियॉ सय्यद | रिजवान अब्दुल गफुर सय्यद, अमीर अब्दुल गफूर सय्यद, नौमान अब्दुल गफूर सय्यद, माझ अब्दुल गफुर सय्यद, अदनान अब्दुल गफुर सय्यद, खालीद अब्दुल गफुर सय्यद |
| १२ | | खारघर ५९० | बळीराम फकीर मयेकर | नितेश बळीराम मयेकर, नुपेश बळीराम मयेकर, कल्पेश बळीराम मयेकर |
| १३ | | पालेखुर्द २३४/२०१ | पवनकुमार राममोहन यादव | ज्योती पवनकुमार यादव |
| १४ | | तोंडरे W-१२८ | हायग्रो ऑरगॅनिक फर्टीलायजर्स | शहादत सुलेमान |
| १५ | | घोटचाळ-७२५ | महेश दिनकर केणी | दिपक रघुनाथ पवार |
| १६ | | घोटचाळ-६४७ | सुनील शिवराम पाटील | दिपक रघुनाथ पवार |
| १७ | | घोटचाळ-७५८ | रामकृष्ण शिवराम पाटील | दिपक रघुनाथ पवार |
| १८ | | रोहिंजण-१०८७ | अर्जुन रामजी पवार | शारदा अर्जुन पवार, प्रभा प्रकाश भोसले, सुहासिनी राजेंद्र दरेकर, सुरेखा अनिल सावंत, कविता अश्विन नाईक |
| १९ | | कोयनावेळे-७३ | विजया विश्राम कदम | योगेश विनेश कदम, चेतन निलेश कदम, ज्ञानेश विनेश कदम |
| २० | | टेंभोडे-३२५ | महेश विनायक पाटील | नलिनी अशोक नाईक |
| २१ | | तोंडरे-W-१२८ | हायग्रो ऑरगॅनिक फर्टीलायझर्स | शहादत सुलेमान जनवी करिम ॲण्ड कं. |
| २२ | | पडघरे-G १३/१३ | लिओ लुब्रीकेन्ट | मे.वाबा |
| २३ | | पेणधर-२१, ३३७ | काना चोट्या पाटील | गुरुनाथ कान्हा पाटील |
| २४ | | पेणधर-२०, २८ | काना चोट्या पाटील | संतोष कान्हा पाटील |
| २५ | | पेणधर-B-८ | पावरिका लि. | क्वार्टर फोल्ड प्रिंट टॉबीलटीज प्रा.लि. |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**